# बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र

BMM बृहन्महाराष्ट्र मंडळ

|| मराठी तितुका मेळवावा ||


वर्ष ४१ अंक ३

On the web www.bmmonline.org

समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक

मार्च २०२१


## अध्यक्षीय



नमस्कार मंडळी,

It snows! It snows!
From out the sky
The feathered flakes,
how fast they fly...

हिमवर्षाव म्हटला म्हणजे हळूवार अशा कविमनांना बहर येतो. आपल्या मराठी हिंदी गाण्यांतूनही हिमवर्षावाची रोमँटिक वर्णने आपल्यासमोर आलेली असतात. परंतु एवढ्या वर्षांच्या इथल्या वास्तव्यात एक गोष्ट मात्र चांगलीच कळलेली आहे, की एरवी मोहक वाटणारे हे पांढरेशुभ्र हिमकण जेव्हा रौद्र रूप धारण करतात तेव्हा कसा हाहाकार उडतो. गेल्या महिन्यात टेक्सासमध्ये हीच परिस्थिती ओढवलेली आपण बघितली. आधीच कोव्हिड-19च्या संकटाशी झुंजत असलेल्या यंत्रणांवर अचानक कोसळलेले हे संकट. अशावेळी सामाजिक भान जागे ठेवत बृहन्महाराष्ट्र मंडळ (बीएमएम/बृ म. मंडळ) मदतीसाठी पुढे सरसावले. संकटात मदतीचा हात देण्यासाठी बीएमएमने 'दीपस्तंभ' उपक्रम सुरू केला आहे. लोकांच्या अडचणी योग्य त्या सरकारी खाते आणि सामाजिक संस्थांपर्यंत पोहोचवण्याचा एक दुवा म्हणून बीएमएम सतत प्रयत्नशील असते. नैसर्गिक संकटेच नव्हे तर उत्तर अमेरिका आणि बाहेरील मराठी बांधवांना काही मदतीची गरज असल्यास बीएमएमच्या टोल फ्री हेल्पलाईनवर संपर्क साधावा.

BMM HELP LINE-1-833-BMM-NAOL (1-833-266-6265)

E-mail : Hema.Rachmale@bmmonline.org or Vidya.Joshi@bmmonline.org

मंडळी, BMMच्या 2022साली होणाऱ्या अधिवेशनाची तयारी जोरात सुरू आहे हे आपण जाणताच. जवळपास तीन वर्षांच्या विरामानंतर प्रत्यक्षात भेटण्यासाठी सगळेच उत्सुक आहेत. हे अधिवेशन यशस्वी व संस्मरणीय करण्यासाठी आपला भरघोस प्रतिसाद व सहभाग अपेक्षित आहे. BMM 2022 अभियानात सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांनी या ग्रूपमध्ये जरूर सहभागी व्हा.

https://chat.whatsapp.com/DwPfj2qlVWR5U5QtmOAkD2

मराठी नववर्षाची सुरुवात म्हणजे गुढीपाडवा. नाटकवेड्या मराठी रसिकांसाठी या मंगलमुहूर्तावर एक छान भेट घेऊन येत आहोत, ती म्हणजे, "**नॉक!नॉक! सेलिब्रिटी**" हे मराठी नाटक. सुमित राघवन, नेहा जोशी यांच्या प्रमुख भूमिका असलेले हे नाटक अगोदरच ध्वनिचित्रित केलेले असेल व ऑनलाईन आपण त्याचा आस्वाद घेऊ. या नाटकाचे प्रयोग आपल्या मंडळातर्फे आयोजित करायचे असल्यास Shilpa.Kulkarni@bmmonline.org किंवा Vidya.Joshi@bmmonline.orgयांच्याशी संपर्क साधा.

मंडळी, कोरोनाच्या संकटाने एक शिकवण आपल्याला दिली, ती म्हणजे परिस्थिती कशीही असली तरी जीवनगाणे गातच रहावे. या तणावपूर्ण काळातही प्रत्येकाने आपल्या मनात एक गाणं जपलंच असेल. हे मनातलं गाणं ओठावर आणण्यासाठी दर महिन्याच्या चौथ्या रविवारी बृ. म. मंडळ 'कराओके' सादर करणार आहे. BMMचा कराओके ग्रूप सुरू होतो आहे. या ग्रूपमध्ये सहभागी होण्याची अट एकच, ती म्हणजे तुम्ही तुमच्या महाराष्ट्र मंडळाचे सदस्य असले पाहिजेत. चला तर मग, 'गाना आये या ना आये...', तरीही मनसोक्त गाण्यासाठी पुढील लिंक क्लिक करा. https://chat.whatsapp.com/Dhi3JOMzzke4l19zbdsOm9 किंवा काही माहिती हवी असेल तर माझ्या ईमेलवर संपर्क साधा.

सध्याच्या काळात आपल्या एकूणच मनःस्वास्थ्यासाठी प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी एक वेबिनार सुरू करण्याची बृ. म. मंडळाची योजना आहे त्याविषयी अधिक माहिती लवकरच मिळेल.

मंडळी,असं म्हणतात. 'मन चंगा तो कठौती मे गंगा!' माणसाचं प्रचंड सामर्थ्यशाली मन नैराश्याचे आगार न होता नवनवीन कल्पना, उमेद आणि आनंद यांनी बहरलेले झाड व्हावे, हीच मनापासू इच्छा! कळावे लोभ असावा, आपली नम्र,


- **विद्या जोशी** (अध्यक्षा, बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका)
Vidya.Joshi@bmmonline.org


***

## या अंकात...


- वाचकांच्या प्रतिक्रिया २
- लेखक तुमच्या भेटीला
- BMM 2022 Convention in New Jersey - Celebration of Life ३
- लेख- दोन सुलट दोन उलट:- एकसारखी नसती दोन! ४
- लेख -आठवणींची मोरपिसे- अनुराधा गानू यांच्या स्मरणार्थ ५
- लेख- एक असामान्य स्त्री:- एमिली वॉरेन ७
- लेख- अशी ही अन्नपूर्णा (दुर्गाबाई भागवत) ८
- कविता:- बर्फाचे वादळ ९
- उत्तररंग सत्र वृत्तांत, एक दिवसाचे शिबीर २७ मार्च १०
- लेख: 'कर विहार सामर्थ्याने...' ११
- पुरवणी ई विभाग:- (On BMM website) :
  Article: Saratoga Serendipity – Recreating a Konkan paradise near Houston, TX
  - लेख: मिनिसोटा! (भाग १)
- BMM YuvaVani - Newsletter
- राशिभविष्य:- मार्च २०२१
Reshimgathee , Business Advertisement १२

**बृहन्महाराष्ट्र वृत्त**

**बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र**
**स्थापना 1981 (शिकागो)**
**संस्थापक**: कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले, जयश्री हुपरीकर
**संपादक:** विनता कुलकर्णी, शिकागो, इलिनॉय
**संपादन-सल्लागार:** मोहन रानडे, फिलाडेल्फिया, पेन्सिल्वेनिया
**बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय**
Mohan Ranade 144 Hope Road, Holland PA 18966
Tel: 1-215-354-1423 (EST), E-mail: brihanmm@gmail.com
**वर्गणीचे दर: Printed Copy: $25/ year**
Subscription payment is accepted online by Paypal at:
http://www.bmmonline.org/vruttasubscription

**जाहिरातींचे दर**
पूर्ण पान: $175   अर्धे पान: $ 100
पाव पान: $ 70   अष्टमांश पान: $ 50

वृत्त दर महिन्यास प्रसिध्द होते. आदल्या महिन्याच्या **२०** तारखेपर्यंत हाती आलेल्या मजकुरातून निवडक मजकूर त्या नजिकच्या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील. मजकूर शक्यतो युनिकोड मराठीत MS word/Text Fileसह ईमेलने पाठवावा. प्रसिध्द झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतातच असे नाही. लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशनयोग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादकांकडे राहतील. पाठवलेल्या साहित्याची पोच ईमेल कळविल्यास दिली जाईल.

**बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी (२०१९-२०२२)**

**मताधिकार असलेले सदस्य**

| | | |
|---|---|---|
| **अध्यक्ष** | विद्या जोशी | शिकागो, इलिनॉय |
| **सचिव** | कोमल चौक्कर | लॉस अँजलीस, कॅलिफोर्निया |
| **कोषाध्यक्ष** | सोना भिडे | फिनिक्स, ॲरिझोना |
| **सदस्य:** | मिलिंद बावडेकर | ॲटलांटा, जॉर्जिया |
| | संदीप बेलखोडे | ऑस्टिन, टेक्सास |
| | संदीप दीक्षित | क्लिव्हलँड, ओहायो |
| | शिल्पा कुलकर्णी | बॉस्टन, मॅसॅच्युसेट्स् |
| | हेमा राचमाळे | डेट्रॉइट, मिशिगन |

**नियुक्त सदस्य**

**माजी अध्यक्ष:** अविनाश पाध्ये, बॉस्टन,
**वृत्त संपादक:** विनता कुलकर्णी, शिकागो, इलिनॉय
**विश्वस्त समिती:**
**अध्यक्ष** मोहित चिटणीस, सिॲटल, वॉशिंग्टन
**सदस्य** नितीन जोशी, शिकागो, इलिनॉय
**सदस्य** सुनील सूर्यवंशी, रिजफिल्ड, कनेटिकट

...

**प्रकाशक:** बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका

**संकेतस्थळ:** http://www.bmmonline.org

Disclaimer: The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.

**अंकासाठी साहित्य/मजकूर पाठविण्याचा पत्ता:**
vinata@gmail.com
3251 Thunderbird Court (E)  Aurora IL, 60503

८ मार्च हा जागतिक महिला दिन आणि अमेरिकेत संपूर्ण मार्च महिना -Women's History Month' साजरा केला जातो. त्या निमित्ताने या अंकात काही महिलांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल काही लेख समाविष्ट केले आहेत.

## वाचकांच्या प्रतिक्रिया

बृ. म. वृत्त फ़ेब्रुवारी २०२१ अंकातील:
- डॉ.. प्रियदर्शन मनोहर यांच्या "काळी माऊ" लेखाविषयी

While I agree on the premise that discrimination should be minimized (it can't be eliminated - human nature.), Manohar takes a very simplistic approach to both the problem and the solution.
For example: It is entirely possible that he will have a negative opinion of me because i disagree with him. And whether someone should act based on JUST that, can be debated, it is entirely possible that in case we meet some day, we wouldn't get along. It would have nothing to do with my race, color, How would he "fix" that?
If I dress up as a homeless person and show off $100 bills or an expensive watch, how would Manohar react?" - **Jayant Kanitkar**

- विनता कुलकर्णी लिखित - भावानुवादित कविता; "प्रसिध्दीची न आकांक्षा मज..." फारच छान अनुवाद झाला आहे. कालातीत विचार,... म्हणूनच ही कविता प्रभावी ठरते, कविता आवडली, इत्यादी... अभिप्राय मिळाले.

- रोहित काळे यांचा- अनुभवलेले तीन देश- वर्णन हा लेख आवडला... असे टेक्स्ट मेसेज व फोनवर अभिप्राय आले आहेत.
सर्वांना धन्यवाद.

***

## 'लेखक तुमच्या भेटीला'

**भाग ६:** २७ फेब्रुवारी, २०२१ रोजी, देवबाप्पा चित्रपटातील सुपरिचित "नाचरे मोरा..." गाण्यावर नृत्य आणि भूमिका केलेली बालतारका म्हणजे आताच्या **डॉ. मेधा गुप्ते प्रधान** (अटलांटा) यांच्याची त्यांच्या "नाच रे मोरा आणि चंदाराणी" पुस्तकाविषयी विनता कुलकर्णी यांनी संवाद साधला. कार्यक्रम यू ट्युब चॅनेलवर पाहू शकता. संकेतस्थळ:
**https://youtu.be/BXWdX86Hwr8**

**भाग ७:** शनिवार - २० मार्च २०२१, **सकाळी ११** सेंट्रल टाईम - कार्यक्रम बृ. म. मंडळाच्या फेसबुक व यूट्यूब वर लाईव्ह : **"प्राध्यापिकेत दडलेली सुग्रण": लेखिका वसुंधरा पर्वते** (कॅलिफोर्निया) यांच्याशी गप्पा गोष्टी करणार आहेत - **कोमल चौक्कर** (कॅलिफोर्निया).

***

BMM 2022 Convention in New Jersey - Celebration of Life

## मराठी विश्व (न्यूजर्सी) संयोजित बृहन्महाराष्ट्र मंडळ अधिवेशन २०२२ वार्ता

### ऑगस्ट ११-१४, २०२२ (अटलांटिक सिटी, न्यू जर्सी)

**- प्रशांत कोल्हटकर**
(**संयोजन-प्रमुख, बृ.म.मंडळ अधिवेशन २०२२ न्यूजर्सी**



नमस्कार मंडळी !

'बृ. म. मंडळाच्या २०२२ मध्ये (बीएमएम २०२२) अटलांटिक सिटी न्यू जर्सी येथे होणाऱ्या २०व्या अधिवेशनासाठी बोधचिन्ह आणि घोषवाक्य स्पर्धा साधारण नोव्हेंबरच्या शेवटी जाहीर करण्यात आली. या स्पर्धेला उत्तम प्रतिसाद मिळाला. आमच्या मार्केटिंग टीमने उत्तम काम केले आणि विविध सोशल मीडियाद्वारे जगभरच्या लोकांपर्यंत बीएमएम २०२२ अधिवेशनाची माहिती पोहचवली. अमेरिका, कॅनडा व भारत येथून पन्नासहून अधिक स्पर्धकांनी यात भाग घेतला. या स्पर्धेचा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला. आमची निवड तुम्हा सगळ्यांना आवडेल अशी आशा आहे. बोधचिन्ह आणि घोषवाक्य विजेत्यांचे मनःपूर्वक अभिनंदन.

बीएमएम २०२२ च्या अधिवेशनासाठी घोषवाक्य म्हणून **"सोहळा अस्तित्वाचा"** हे सॅन होसे, कॅलिफोर्निया येथील **श्री. मनोज ताम्हणकर यांनी दिलेले घोषवाक्य** निवडण्यात आले आहे. सध्याचा कोविड-१९च्या संकटावर आपण आज ना उद्या मात करूच,आयुष्य पुन्हा सुरळीत होईल आणि अस्तित्वाचा सोहळा एकत्र मिळून साजरा करायला आपण पुनःश्च तयार असू. तसेच भारतातील मुंबई येथील **श्री. सुधाकर मोरे बोधचिन्ह स्पर्धेचे विजेते** ठरले आहेत.

बोधचिन्हातला उगवणारा सूर्य अधिवेशनातल्या सकारात्मक ऊर्जेचे आणि आशेचे प्रतीक आहे, भगवे झेंडे उत्तुंगतेचा ध्यास व मराठी संस्कृतीबद्दल आपला अभिमान दर्शवते आणि अमेरिका कॅनडा यांचे राष्ट्रीय ध्वज आपल्या कर्मभूमीची जाणीव करून देतात. अधिवेशनस्थळी पाहुण्यांचे स्वागत तुतारी वाजवून आणि हळदीकुंकू लावून दिलखुलासपणे करू हे बोधचिन्ह दर्शवते.

**सह-संयोजक श्री. अमर उन्हेकर ह्यांचा शब्दांमध्ये**



कोविड नंतर प्रथमच इतक्या मोठ्या संख्येनी हा सोहळा संपन्न करण्यासाठी आपण जमणार आहोत, म्हणून बोधचिन्हात उगवत्या सूर्याची पार्श्वभूमी आशावाद सूचित करते. भगवा झेंडा हे आपल्या मराठी माणसांचं अभिमानाचं, पताका हे विजयाचं आणि हळदीकुंकू हे पावित्र्य आणि मांगल्याच प्रतीक म्हणून दाखवलं आहे. BMM ही तिन्ही अक्षर एकमेकांना जोडलेली दाखवून आपण सर्व एकजूटीने, एकाच ध्येयाने हा सोहळा आनंदाने साजरा करू हे सूचित केलं आहे. अधिवेशनस्थळ अटलांटिक सिटी असल्यान विशिष्ट neon sign's look' बोधचिन्हात आहे. सर्व संकटांवर मात करुन मराठी अस्तित्वाच्या या सोहोळ्याची घोषणा आम्ही यशाची तुतारी फुंकून करीत आहोत.

**सुविधा व्यवस्थापन प्रमुख श्री. अमोल पुरव ह्यांचा शब्दांमध्ये:**




अधिवेशनाचे बोधचिन्ह म्हणजे मराठी साम्राज्य व संस्कृतीचा जाज्वल्य अभिमान दर्शविणारी आपली मातृभूमी आणि हा मराठी सोहळा जिथे संपन्न होणार ती आपली अमेरिकन कर्मभूमी ह्या दोन्हींचा उत्कृष्ट मिलाफ आहे.

**फूड कमिटीच्या प्रमुख सौ. पूजा शिरोडकर ह्यांचा शब्दांमध्ये:**



अधिवेशनाच्या बोधचिन्हामधील उगवता सूर्य उद्याची पहाट खूप सुंदर असणार आहे हा आशावाद दर्शवते. बोधचिन्हातील इतर चिन्हे वर नमूद केल्याप्रमाणे मराठी संस्कृतीचे निदर्शक आहे. दिव्यांची रोषणाई व पताका ही सजावट आकर्षक दिसतेय. घोषवाक्य "सोहळा अस्तित्वाचा" आपण कोरोनाच्या संकटावर मात करून पुन्हा एकदा समर्थपणे उभे राहू याची साक्ष पटवते.

**प्रोग्रामिंगचे प्रमुख श्री. संदीप धरम ह्यांचा शब्दांमध्ये:**



बोधचिन्हातून आम्ही सूचित करत आहोत, उगवत्या सूर्यकिरणांच्या मांगल्याने मनातील अंध:कार दूर करूया. दिंड्या पताकांच्या रोषणाईत, तुतारींच्या घोषात सजवूया मराठी संस्कृतीचा सोहळा. निसर्गासमोर नतमस्तक होऊन, अटलांटिक महासागराच्या किनाऱ्यावरील कॅसिनो सिटी मध्ये २०२२ चे बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अधिवेश दणक्यात साजरे करूया.

चला तर मग तुम्ही आम्ही मिळून रचू एक नवा इतिहास आणि होऊ एका ऐतिहासिक घटनेचे साक्षीदार! आम्ही सर्वच आपल्या भेटीसाठी उत्सुक आहोत. Welcome to BMM 2022 !

# दोन सुलट दोन उलट

**- विद्युल्लेखा अकलूजकर** (व्हँकूव्हर, कॅनडा)



### एकसारखी नसती दोन!

"O why can't a woman be like a man?"असा एक गंमतीदार प्रश्न जॉर्ज बर्नार्ड शॉच्या नाटकातला हेन्री हिगिन्स हैराण होऊन विचारतो. चारपाच कडव्यांचे ते गाणे बरेच गाजले होते. विसाव्या शतकात कित्येक लोकांना तो प्रश्न ऐकून खरेच मनात यायचे, की का नाही बरं बायका जरा पुरुषांसारख्या म्हणजेच सरळसाध्या, चांगल्या, शहाण्यासुरत्या वागत? पण तो प्रश्न जरी प्रेक्षकात तात्पुरते हास्य निर्माण करणारा असला, तरी उत्तर मिळवणारा नाहीच मुळी! कारण बाई आणि पुरुष यांच्यातला फरक आदिम आहे, अपरिहार्य आहे आणि अपेक्षितही आहे! नुसत्या बायका पुरुषासारख्या नसतात, इतकेच नाही, तर एक बाईदेखील दुसरीच्यासारखी कधी नसतेच मुळी!

बाई कशी असते, हे सांगणे जरी कठीण असले, तरी ती बाई म्हणून दीनदुबळी, अबला किंवा निर्बुद्ध कशी नसते, हे तरी आता जगाला पुष्कळसे कळायला लागलेले आहे. आणि एक स्त्री कायकाय करू शकते, याची माहितीदेखील सोशल मीडियामुळे जगभरच्या लोकांना भरपूर मिळू लागलेली आहे. मार्च महिन्यात येणाऱ्या जागतिक स्त्री-दिनाच्या संदर्भात तर स्त्रियांच्या सक्षमतेची आणि स्त्री-शक्तीची इतकी उदाहरणे जागोजाग दिसू लागली आहेत, की पाहू तिथे स्त्री-शक्तीची ध्वजा फडकताना दिसेल.

हे २०२१ साल उजाडले, तोच १० जानेवारीला एक वार्ता कानी आली, की जगातले सर्वात लांबलचक उड्डाण नुकतेच एअर इंडियाच्या संपूर्ण स्त्री-वैमानिकांच्या संघाने पार पाडले. सान फ्रान्सिस्को शहरापासून निघून उत्तर ध्रुवावरून हे उड्डाण १७ तासांत १६,००० कि.मी.चे अंतर तोडून बंगलूरुला पोचले. व्यावसायिक विमानकंपनीचे हे पहिलेच इतके लांबलचक उड्डाण होते आणि ते या स्त्री-वैमानिकसंघाने यशस्वी करून दाखवले. जणू या विमानाच्या कॅप्टन झोया अगरवाल, कॅ. आकांक्षा सोनावणे, कॅ. शिवानी मनहास, कॅ. पापागरी तन्मय यांनी आकाशातून संघटित स्त्री-शक्तीचा एक झोत टाकून जगाला चकित केले.

स्त्रियांचे नेतृत्व आता जगाला अपरिचित राहिलेले नाही. २०२० सालात जगातील अनेक देशांतील प्रमुख पदावर स्त्रिया आहेत. गेली दहा वर्षे बांगलादेशच्या पंतप्रधान असलेल्या शेख हसीना, नेपाळमध्ये प्रथमच राष्ट्रपतिपदावर आलेली आणि त्यांच्या सैन्याचीदेखील प्रमुख झालेली बिद्यादेवी भंडारी, ही काही ठळक उदाहरणे.

त्साय इंगवेन ही रिपब्लिक ऑफ चायना किंवा तायवानची पहिली अविवाहित स्त्री प्रेसिडेंट आहे तर सर्बियाची पंतप्रधान, आना बर्नाबिक ही केवळ पहिली स्त्रीच नव्हे, तर गे म्हणून प्रकट झालेली स्त्री आहे. याशिवाय डेन्मार्क, बेल्जियम, बोलिव्हिया, एस्टोनिया, न्युझीलंड, आइसलंड, त्रिनिदाद आणि टोबेगो, बार्बेडोस, फिनलंड, जॉर्जिया, इथिओपिया वगैरे अनेक देशांमधे स्त्रियाच सत्ता-प्रमुख पदे किंवा महत्त्वाची अनेक पदे भूषवताना दिसतात. २०१७ सालापासून कॅनडाची गव्हर्नर जनरलदेखील ज्यूली पेयेत ही स्त्रीच आहे.

पण राजकारणातील सत्ताधाऱ्यांपेक्षाहि ज्या स्त्रिया चिरकाल टिकणाऱ्या सामाजिक सुधारणा करून दाखवतात, त्यांचे मोल मला नेहमीच अधिक वाटत आले आहे. त्यांचा प्रभाव समाज-मनावर अधिक काळ टिकतो, आणि त्यांचे ऋणही फार महत्त्वाचे असते. उदा. भारतातील पहिली स्त्री वृक्षतज्ञ जानकी अम्मल (१८९७-१९८४) हिची नेत्रदीपक कामगिरी. या केरळकन्यका जानकी अम्मलने इंग्रजी राजवटीत परदेशात शिकायला जाऊन अमेरिकेतून युनिव्हर्सिटी ऑफ मिशिगनमधून प्लांट सायन्सेसमधील पीएच डी डिग्री १९३१ साली मिळवली, आणि त्यानंतर १९४० मधे इंग्लंडमधे ती नोकरीसाठी गेली. तिथे प्रथम तिने सिरिल डीन डार्लिंग्टन या शास्त्रज्ञासह काम करून Cromosome Atlas of Cultivated Plants हा अजूनही उपयुक्त गणला गेलेला असा ग्रंथ प्रकाशित केला. काही काळानंतर वाइजली येथील रॉयल हॉर्टिकल्चरल सोसायटीमधे तिने १९५० पर्यंत सायटॉलजिस्ट म्हणून नोकरी केली. तिथल्या तिच्या संशोधनाचे फलित म्हणजे मॅग्नोलियाचे एक पांढरे-जांभळे फूल, ज्याला त्या सोसायटीने तिच्या स्मरणार्थ Magnolia Kobus Janaki Ammal हेच नाव दिलेले आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यावर पं. जवाहरलाल नेहरूंच्या विनंतीमुळे भारतात परतून तिने अनेक चांगले उपक्रम पार पाडले. उसाच्या पिकाच्या तिने अनेक संकरित जाती शोधून काढल्या. तिच्या आयुष्याच्या संध्या-काळात तिने भारतातील नैसर्गिक वनसंपत्ती टिकवण्यासाठी भरपूर प्रयत्न जारी ठेवले. आणि तिने ठाम भूमिका घेतल्यामुळेच केरळातील सायलंट व्हॅली नॅशनल पार्क हे अभयारण्य आज अनेक दुर्मिळ फुलझाडे आणि इतर वनशोभा जोपासत सुरक्षित राहिलेले आहे. नाहीतर १९७० साली ते पाण्याखाली घालण्याचा तेव्हाच्या सरकारचा प्रकल्प पुढे गेला असता, तर ते सगळे वनवैभव नष्टच झाले असते. परंतु तिच्यासकट अनेकांच्या सक्रिय विरोधामुळे १९८४ साली सरकारने तो प्रकल्प सोडून दिला, आणि जानकी अम्मलच्या चळवळीला यश मिळाले. पण ती ते बघायला तेव्हा जिवंत नव्हती. तरी तिचे भारतभूमीवरचे, वनवैभवावरचे उपकार विसरता येत नाहीत.

या जानकी अम्मलचा हिरवा वारसाच जणू पुढे चालवणारी सध्याची वृक्षमाता म्हणजे २०१९ सालात भारताची पद्मश्रीविभूषिता सालुमरद तिम्मक्का. मला या दोन्ही आदरणीय महिलांची कामे पाहताना कविवर्य ग. दि. माडगूळकरांचे शब्द आठवतात. "या वस्त्रातें विणितो कोण? एकसारखी नसती दोन!" कारण जरी या दोन्ही भारतीय महिला वृक्षसंपत्तीच्या पालनपोषणाशी निगडित असल्या, तरी त्यांच्यातले साम्य तिथेच संपते. प्रत्यक्षात त्या एकमेकींपेक्षा फारच वेगळ्या वातावरणात, वेगळ्या घरात वाढल्या आणि वेगळेच जगल्या.

वृक्षसंशोधक जानकी अम्मल अत्यंत पुढारलेल्या, संपन्न आणि विद्याविभूषित आईवडिलांच्या घरात एकोणिसाव्या शतकाअखेरीस जन्माला आली. १९ मुलांमधील दहावी ती होती. वडील जज्ज होते, घरात बाग होती, आणि वडिलांनी उत्तर

मलबार भागातील पक्ष्यांबद्दल दोन पुस्तकेही लिहिली होती. अशा कुटुंबातील जानकी अम्मलने बाकीच्या बहिणींप्रमाणे लग्न वगैरे न करतां, भरपूर शिकण्याचा, परदेशी शिकण्यासाठी जाण्याचा मार्ग निवडला, आणि हिमतीने शिक्षण, संशोधन, आणि स्वदेशातही उद्बोधन करीत तो पार पाडला.

याउलट तिम्मक्का हातावरचे पोट असलेल्या अशिक्षित, गरीब कामगार आईबापांच्या पोटी विसाव्या शतकातच पण कर्नाटकात जन्मली. शालेय शिक्षणाचा लाभ तिला झालाच नाही, दगडफोडीचे काम करीतच ती वाढली. स्वत:च इतर अनेक कामे शिकली. आपल्याच सारख्या गरीब, अशिक्षित चिक्कय्याशी घरच्यांनी लग्नगाठ घालून दिल्यावर सुखाचा संसार करू लागली. लग्नानंतर २०-२५ वर्षे झाली तरी मूलबाळ होईना, तेव्हा वांझपणाच्या शिक्क्यामुळे आणि समाजातील कुटाळकी आणि निंदा यामुळे हैराण झाली. तरी शहाणा आणि पाठीराखा नवरा मिळाल्यामुळे त्या दोघांनी आपण वडाची झाडे लावूया आणि त्यांनाच आपली बाळे समजून जोपासूया असे ठरवले.

एकेका वडाला कलम करून रोपटी तयार करायची आणि तसे एकेक नवीन रोपटे रस्त्याच्या कडेला पावसाळ्याआधी लावून पावसाच्या पाण्यावर ते नीट वाढवायचे, असे तिने आणि त्याने अनेक वर्षे मनापासून केले. त्यांनी चारचार बादल्या पाणी हाताने नेऊन त्या रोपटयांना अनेकदा घातलेदेखील. पहिल्या वर्षी दहा रोपट्यांपासून सुरुवात करून, दुसऱ्या वर्षी १५, तिसऱ्या वर्षी २० असे करीत करीत त्यांनी हुलिकल ते कडूर या पाच किलोमीटर्सच्या पट्ट्यात हमरस्त्याच्या दोन्ही बाजूला आतापर्यंत एकूण ३८४ असे वटवृक्ष लावून, जोपासून वाढवलेले आहेत. जानकी अम्मलच्या केरळातील वनसंगोपनाच्या कार्यासारखेच तिम्मक्कानेही या स्वत: लावलेल्या कर्नाटकातील वटवृक्षांना कुऱ्हाडीच्या दांड्यापासून वाचवले आहे. कारण २०१९ सालच्या बागेपल्ली ते हलगुरू या रस्तारुंदीच्या प्रकल्पामधे ती लावलेली सगळी झाडे छाटली गेली असती, पण तिम्मक्काने तिथल्या मुख्यमंत्र्यांना, आणि उपमुख्यमंत्र्यांना गळ घातली, आणि ती सत्तर वर्षांची सुंदर जोपासलेली झाडे तोडण्यापासून परावृत्त केले, म्हणून ती सगळी वाचली.

वांझपणाबद्दल सामाजिक टीका, छळवाद सोसण्याच्या दिवसांपासून आतापर्यंत तिम्मक्काचा प्रवास वेगळ्याच दिशेने झालेला आहे, कारण आता तिला वृक्षमाता म्हणून नुसते ओळखत नाहीत, तर अनेक शुभकार्यांसाठी तिचा आशीर्वाद घ्यायला तिला बोलावले जाते, अनेक लग्नातदेखील जोडप्याला आशीर्वाद द्यायला तिला आवर्जून बोलावतात. रूढीग्रस्त समाजमनाचा बंद दरवाजा तिच्यासाठी उघडला असेच म्हणायला लागेल. तिला आंतरराष्ट्रीय प्रसिद्धी आणि पद्मश्रीसह पाचपन्नास सन्मानही एव्हाना मिळालेले आहेत, पण अजूनही तिचे हाती काम करणे बंद झालेले नाही. शंभरावर पाचसात वर्षांचे तिचे वय असताना ती आजही शेतात दिवसभर राबून आणि स्वत: पिकवलेल्या गोष्टी विकूनच आपले घर चालवते. १९९१ साली श्री. चिक्कय्याचा मृत्यू झाला. तरी तिचे काम अखंड चालूच राहिले. त्यानंतर तिने एका वृक्षारोपणाची आवड असलेल्या आणि वृक्षसंगोपनात हुशार अशा मुलाला दत्तक घेतले. हा "वनश्री उमेश" आता तिला आणि तिने लावलेल्या वृक्षसंपत्तीला सांभाळतो, पण ही सर्व संपत्ती त्यांनी समाजाला दान करून टाकलेली आहे. या अनमोल कार्याचे मोल कसे करणार? केवळ हात जोडणे आणि अशा प्रकल्पांना जमेल तशी खरोखरीची मदत करणे एवढेच आपल्या हातात उरते. या परिपक्व वयातही उरात बाळगलेले, आपल्या खेड्यासाठी एक हॉस्पिटल बांधण्याचे तिम्मक्काचे स्वप्न पुरे होवो अशी मी आशा करते. जिज्ञासूंनी तिच्याबद्दलचा एक माहितीपट जरूर पाहावा. तो असा:

#SaaluMaradaThimmakka #Documentary #NKMCreations

***

# आठवणींची मोरपिसे

## अनुराधा गानू यांच्या स्मरणार्थ

**-विद्या हर्डीकर सप्रे** (मरिएटा, कॅलिफोर्निया)

अनुराधा गानू ! तिच्या व्यक्तिमत्वाला एक मृदुल पण डौलदार पिसारा होता! त्याचे मोरपिशी रंग तिच्या स्वप्नांना होते. स्वप्नांना शब्दांकित करण्याचं डोळस लाघव तिच्याकडे होतं. ते शब्द सत्यात उतरवण्याचा अखंड ध्यास तिला होता. कधी नभात मेघ दाटून आले तर, कधी उन्हाची तलखी ; पण तिच्या स्वप्नांचे रंग तजेलदार मोरपिशी ; शब्द टवटवीत आणि तिचा ध्यास नवीनतेचा !

अनुराधा गानू हे लॉस एंजेलिस भागातील



एक बहुगुणी व्यक्तिमत्व ! बुद्धिमान विद्यार्थिनी, अगत्यशील सुगृहिणी, प्रेमळ मैत्रीण, यशस्वी व्यवसायिका, विचारवंत लेखिका, तरल स्वप्निल कवयित्री आणि गीतकार, प्रयोगशील नाट्यकर्ती, कुशल अभिनेत्री, समाजऋण मानणारी कष्टाळू कार्यकर्ती, अशी अनेक गुणरत्न अनुराधाच्या पिसाऱ्याला होती.

"गुणसुमने ही वेचियली या भावे ।
की 'तिने' सुगंधा घ्यावे ॥" - अशी सावरकरांच्या कवितेतली वृत्ती अनुराधामध्ये होती. जन्मभूमी, कर्मभूमी आणि मायमराठी ही अनुराधाच्या कामामागची तीन सूत्र होती.

अनुराधा म्हणजे पूर्वाश्रमीची मीना देवधर. अर्थशास्त्र विषयात प्रथम क्रमांकाचं यश मिळवून, विवाहानंतर अमेरिकेत आली. इथेही M.B. A. आणि C.P.A. करून स्वतः:चा व्यवसाय सुरू केला. खरं तर मराठी साहित्य हा तिच्या पदवीच्या अभ्यासाचा विषय नव्हता. पण आपल्या मुलांना मराठी शिकवताना आजूबाजूच्या मराठी मुलांना मराठी शिकवण्यासाठी अनुराधाने प्रयोग सुरू केले. 'कल्पकतेने व रंजकतेने मराठी कसे शिकवावे आणि मुलांना मराठीची गोडी कशी लावावी' हा ध्यास होता. रवींद्रनाथांच्या 'काबुलीवाला' या नाटुकल्याचं मराठी लेखन व नाट्यप्रयोग हा तिचा पहिला प्रकल्प. त्यानंतर 'परीची शाळा' नावाचा सुमधुर बालगीतांचा; पुस्तक आणि पाटीसह व्हीसीडी संच काढून तिने प्रत्येक मराठी घरात मराठी पोहोचवण्याचा मोठा प्रयोग केला. मराठीसाठी शैक्षणिक साधने बनवण्याचा हा

अमेरिकेतील पहिला प्रयोग.

मराठीच्या प्रेमामुळेच लॉस एंजेलिस मराठी मंडळात अनुराधाचा बरीच वर्षे सक्रीय सहभाग होता. कार्यकारिणीच्या कामात अगदी पदर बांधून मोदक करण्यापासून ते कार्यक्रमांचे संहिता लेखन करून नाटकात भूमिका करण्यापर्यंत ! येसूबाई पासून ते पु लंच्या 'एक रविवार सकाळ' मधील ठसठशीत कानडी मामी पर्यंत; तिच्या अनेक भूमिकाही प्रेक्षकांच्या चांगल्याच लक्षात आहेत !

अनुराधाने विविध प्रकारचे लेखन केले. ललित लेख, कविता, याबरोबर नाटक, संगीतिका , वगनाट्य, नृत्य नाट्य असे सादरीकरणाचे लेखन आणि प्रयोग अनुराधाने पुष्कळ केले. लेखनात विषयांची आणि विचारांची समृद्धता आहे. तिची बहुश्रुतता जाणवते. अनेक वेळा पुनर्लेखन करण्याची आणि ते घासून पुसून लखलखीत करण्याची तयारी आणि कष्ट तिच्या लेखनात दिसतात आणि त्याचे चीजही झाले. काही उदाहरणे द्यायची तर कॅपिटल पनिशमेंट या इंग्रजी काव्यसंग्रहाचा 'अजब तुझे सरकार' हा सुंदर अनुवाद करून तिने मंगेश पाडगावकरांची 'हे तर अनुसर्जन' अशी शाबासकी मिळवली. तिच्या सुमधुर गीतांना चाली लावून त्यांची अनुराधा पौडवाल आणि श्रीधर फडके यांच्या आवाजातली "दाटून आले मेघ नभात" ही ध्वनिफीत प्रसिद्ध झाली. लोकसत्तेत लोकरंग पुरवणीत प्रसिद्ध झालेले तिचे 'मोरपिसे' हे स्तंभलेखन खूप लोकप्रिय झाले. त्याचे नंतर ग्रंथाली प्रकाशनतर्फे पुस्तक प्रसिद्ध झाले. तिने पुष्कळ धडपड करून 'मोरपिसे'चा इंग्रजी अनुवादही प्रकाशित केला.

एकता या त्रैमासिकातलं एकमेकींच लेखन वाचलं आणि माझी अनुराधाशी ओळख झाली. मैत्र जुळले. मुळात सामाजिक बांधिलकीची जाणीव असल्यामुळे स्वतःजवळ असलेली लेखनकला आणि नाट्यगुणांचा उपयोग करून सामाजिक प्रकल्प करण्याची माझी संकल्पना तिला अगदी सहज पटली ! संगीतासाठी डॉ. गोपाळ मराठे यांनी हात पुढे केला. मग पुढचे अनेक निधिसंकलन उत्सव आम्ही एकत्रितपणे केले.

लॉस एंजेलिसमधील अनेक मराठी कुटुंबे आमच्याबरोबर एकत्र येऊन मोठ्या प्रमाणावर योगदान करू लागली. 'माझे माहेर पंढरी'च्या दोनशे कलाकारांच्या भव्य कार्यक्रमाने ही वाटचाल सुरू झाली. ती तीस वर्षे चालली. आणखी काही उदाहरणे म्हणजे 'हरवले ते गवसले का' हे वगनाट्य ! यात अमेरिकेत स्थलांतरित झालेल्या मराठी माणसांच्या पहिल्या पिढीने काय कमावले आणि काय गमावले याचा आलेख होता. 'माझी माय सरोसोती' ही अनुराधा गानूने लिहिलेली आणि निर्मिती केलेली बहिणाबाईंच्या आयुष्यावरची संगीतिका गाजली. अर्थात त्यात तिने भूमिकाही केली होती. अशा काही निधिसंकलन उत्सवातून महाराष्ट्रात मांगवली, हराळी अशा गावी चांगले प्रकल्प उभे राहिले. याशिवाय पंचतंत्रावर आधारित 'सफारी' या संगीतिकेचा प्रयोग लॉस एंजेलिस मराठी मंडळाच्या मदतीसाठी केला.

'माझी माय सरोसोती' कार्यक्रमावर अनुराधाचा विशेष जीव होता. त्यामुळे ते २००९च्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनात सादर करावे म्हणून त्याचे पुनरुज्जीवन करून तिने त्याची तयारी केली. सराव उत्साहाने सुरू झाला. 'माझी माय सरोसोती' मुख्य रंगमंचावर ठरले होते. तिचे एक स्वप्न साकार होणार होते. पण अधिवेशन आठ दिवसावर येऊन ठाकलं असताना अचानक तिच्यावर पक्षाघाताचा जोरदार आघात झाला, ती अक्षरशः कोलमडली ! कार्यक्रम रद्द करावा लागला.

पण अनुराधाची जिद्द अशी, की त्यानंतरच्या एका मागोमाग एक आलेल्या नवनव्या आजारांना तोंड देत देत तिने सात वर्षांनी सोलापूरच्या रंगमंचावर हजार लोकांच्या उपस्थितीत, तिथल्या स्थानिक कलाकारांना घेऊन 'सरोसोती' सादर केली ! अनुराधाने तब्बल जिद्दीने शारीरिक व्याधींचा सामना केला. पण तिने लेखन सोडलं नाही, की आपले प्रयोगशील प्रकल्प सोडले नाहीत. अमेरिकेतल्या गरीब लोकांसाठी गोधड्या बनवण्याचा एक उपक्रम केला. इंग्रजी कवने लिहिली. गीता पाठ केली. आणि अनेक गोष्टी!

अनुराधाचा आणखी एक गुण म्हणजे तिची पाककला. लोकसंग्रह दांडगा. लोकांना बोलावून प्रेमाने जेवू खाऊ घालण्याची हौस. त्यामुळे मित्र मैत्रिणी, पाहुणे यांची वर्दळ गानू कुटुंबाकडे असे. प्रकाश, मंदाकिनी आमटे, जयंत आणि मंगला नारळीकर, ग्रंथाली प्रकाशनाचे लोक, वसंत बापट, व्यंकटेश माडगूळकर यशवंत देव,असे खास पाहुणेही येऊन गेले. त्यांच्या बरोबर अनौपचारिक सभा रंगल्या. त्यांची आठवण लॉस एंजेलिस भागातल्या मराठी रसिकांना आहे. तशी अनेक मराठी अधिवेशनात आणि मराठी मंडळाच्या कार्यक्रमात अनुराधाने लिहिलेली सुंदर गीते लोकांच्या अजून आठवणीत आहेत.

परमेश्वराच्या सर्जनशीलतेची अनेक विलोभनीय रूपे अनुराधाच्या संवेदनशील कविमनाला दिसली. आजूबाजूच्या माणसात ती पहाण्याचा प्रयत्न तिने केला आणि आपल्या कुवतीनुसार आजूबाजूचं जग सुंदर करण्याचा ध्यास तिने घेतला. कधी नभात मेघ दाटून आले तर ,कधी उन्हाची तलखी ; पण तिच्या स्वप्नांचे रंग तजेलदार मोरपिशी; शब्द टवटवीत आणि तिचा ध्यास नवीनतेचा होता. अनेक लोकांना निर्मळ प्रेम देऊन, आणि आठवणींची मोरपिसे देऊन अनुराधानं अखेर नऊ फेब्रुवारी २०२१ रोजी चिरविश्रांती घेतली.

तिच्या मागे पती वामन, मुले सिद्धार्थ व विक्रम आणि सुना नातवंडे आहेत.

***

## पुरवणी ई विभाग (बृ. म. मंडळाच्या संकेतस्थळावर)

-**'मिनिसोटा' (भाग१) केतकी पाटील पारखी** (व्हॅन्कुव्हर, कॅनडा)

- **Saratoga Serendipity – Recreating a Konkan Paradise near Houston, TX** - By **Sharmila and Vikas Moharir** (Saratoga, TX)

**वाचण्यासाठी: Click:**
**https://bmmonline.org/vrutta-supplements/**

- **राशिभविष्य: मार्च २०२१** - **दादा दामले** (न्यू जर्सी)

**Click: https://bmmonline.org/rashi-bhavishya/**

- **Yuva-Vani: Newsletter, March 2021:**

**Click: https://bmmonline.org/yuva-vani-archives/**

# एक असामान्य स्त्री -एमिली वॉरेन

- **सुधीर शं. कुलकर्णी** (लेथम, न्यू यॉर्क)



'ब्रूकलिन ब्रिज' न्यू यॉर्क शहराचे प्रतीक म्हणून (सिग्नेचर ब्रिज) ओळखला जातो. जर्मनीत सन १८०६ मध्ये जन्मलेले जॉन रोबलिंग शिक्षणाने वास्तुशिल्पी (आर्किटेक्ट)होते. वयाच्या २५ व्या वर्षी ते अमेरिकेत आले. तिथे त्यांना तारांनी विणलेल्या दोराची (वायररोप) कल्पना सुचली. आणि वायररोप बनवणारी मिल त्यांनी 'ट्रेंटन , न्यू जर्सी'मध्ये चालू केली. चिकित्सक वृत्ती, कुशाग्र बुद्धी व प्रचंड इच्छाशक्ती ह्यांच्या जोरावर सन १८५५ पर्यंत त्यांनी वायररोपच्या केबलांचे दोन निलंबी (सस्पेंशन) पूल अभिकल्प (डिझाईन)करून बांधले. सन १८५७मध्ये न्यू यॉर्क'मधील मॅनहॅटन व ब्रूकलिन ह्यांना जोडणाऱ्या वायररोपच्या केबलांच्या निलंबी पुलाचा प्रस्ताव जॉन रोबलिंग ह्यांनी दोन्ही नगरपालिका अध्यक्षांपुढे मांडला (त्याकाळांत ती दोन वेगळी शहरे होती.)

ईस्ट रिव्हरवरील हा पूल बांधण्याच्या स्वप्नाचा पाठपुरावा १२ वर्षे सतत करत असताना, जॉन रोबलिंगनी ब्रूकलिन ब्रिजच्या सर्व कल्पना कागदावर मांडल्या व त्यात नुकत्याच इंजिनीयर झालेल्या मुलाला- वॉशिंग्टनला सामावून घेतल्याने ते स्वप्न साकारण्यास पुढे फार मदत झाली. जून १८६९ मध्ये सर्व सोपस्कार पूर्ण झाल्यावर पुलाच्या अभिकल्पाला नवीन स्थापन झालेल्या न्यू यॉर्क ब्रिज कंपनीची मंजूरी मिळाली. त्यानंतर पुलाचे मोजमाप (सर्वे) करत असताना जॉन ह्यांना दुर्दैवी अपघात झाला व पुढे धनुर्वातामुळे ते मृत्यूमूखी पडले. जॉन ह्यांचे निधन झाले तरी पुलाची वाटचाल वॉशिंग्टन मार्फत चालू राहिली.

निलंबी पुलाच्या केबलांच्या आधारासाठी नदीच्या दोन्ही काठावर दोन मनोरे (टॉवर्स) उभारण्याची योजना होती. त्याच्या पायासाठी वायुधारी कुसुले (नुमॅटिक केसॉन) नदीच्या पाणी पातळीपासून खाली ४५ फुटावरच्या खडक किंवा ठणक मातीवर टेकवण्याचे काम इतके सोपे नव्हते. कुसुलात बाहेरच्या खुल्या हवेच्या साधारण तिप्पट/चौपट दाबाच्या हवेत कामगारांना खोदकाम करावे लागे. अशा धोकादायक वातावरणाने काही कामगार मृत्युमुखी पडत, काहींना 'कुसूल आजार' (द बेन्ड्स) झाल्याने इस्पितळाची वाट धरावी लागे. तसेच कुसुलात खोदकामासाठीं वापरलेल्या सुरुंगांच्या उपयोगाने आगी लागण्याचाही धोका उद्भवत असे.

१८७२च्या उन्हाळ्यात मॅनहॅटन कुसुलाच्या गुहेत एका रात्री आणीबाणीच्या प्रसंगाला तोंड देत असताना, वॉशिंग्टनला अर्धांगवायूचा झटका आल्याने इस्पितळात न्यावे लागले. वडिलांसारख्या जबरदस्त इच्छाशक्तीचे वॉशिंग्टन काही दिवसात परत कामाला लागले परंतु दुर्दैवाने पक्षघाताने त्यांचे अंग लुळे पडले. प्रकृती सुधारण्यासाठी तीन वर्षे ते परत आपल्या ट्रेंटनच्या घरात राहायला गेले. सन १८७६ पासून ते पुलाजवळील एका इमारतीत राहू लागले, मात्र अंथरुणाला खिळून! आपल्या पत्नीच्या -एमिलीच्या सहाय्याने बांधकामावरील अभियंत्यांशी ते संपर्क साधत होते.

एमिली वॉरेन ही एका सैन्य अधिकाऱ्याची बहीण होती. त्याकाळात अमेरिकेत यादवी युद्ध सुरू होते. त्यात भाग घेण्यासाठी वॉशिंग्टन १८६१मध्ये सेनेत भरती झाला व एमिलीच्या भावाच्या तुकडीत काम करू लागला. तिथे ओळख होऊन त्या दोघांचे लग्न १८६५मध्ये झाले. १८६८ पासून वॉशिंग्टन आपल्या वडिलांना पूल बांधकामात मदत करू लागला. तो अपंग झाल्यावर एमिलीने आपल्या वाग्चातुर्याने न्यू यॉर्क ब्रिज कंपनीला पटवून दिले, की वॉशिंग्टनला मुख्य अभियंता म्हणून चालू ठेवावे आणि ती विनंती त्यांनी मान्य केली.

मधांतरीच्या काळात एमिलीने पूल बांधकामासंबंधीची तोंडओळख करून घेतली. व्हिक्टोरियन युगातील एका स्त्रीमध्ये- जी चूल आणि मूल ह्यात व्यस्त असे, पूलबांधणी सारख्या विषयात क्षमता किंवा आकलन करण्याची मानसिकता नसते-.हा त्या काळचा समज एमिलीने खोटा ठरवला! ती आपल्या नवऱ्याची अक्षरशः -"डोळे, कान व हात" बनली ! अंथरुणात पडून वॉशिंग्टन आपल्या हस्ताक्षरांत वेळोवेळी पूल उभारणी-संबंधित सूचना लिहीत गेले. तसेच रेखाचित्रेही (स्केचेस) काढून ठेवू लागले, एमिली त्या सूचना व चित्रे घेऊन पुलकामावरील सहाय्यक अभियंतांना नेऊन देण्याचे काम करत असत. त्याचप्रमाणे त्यानुसार काम झाले ह्याची खात्री करून घेत होत्या. मधून मधून वॉशिंग्टन आपल्या खोलीतून दुर्बिणीमार्फत पुलबांधकामाच्या प्रगतीचे निरीक्षण करत असत. नंतर वॉशिंग्टन ह्यांची दृष्टीही क्षीण होत चालली. तेव्हा त्यांना आलेला पत्रव्यवहार वाचून दाखवणे व त्यावर त्यांचे उत्तरही लिहिण्याचे काम एमिली करू लागली. त्यामुळे केबलउभारणी सारख्या तांत्रिक विषयाचे ज्ञानही तिला प्राप्त होऊ लागले. म्हणूनच वॉशिंग्टनने तिच्याविषयी लिहिले आहे, "माझी पत्नी माझ्यासाठी असा एक मजबूत मनोरा आहे, की मी तिला टेकून उभा राहू शकतो. तिच्याकडे कोठल्याही कठिण परिस्थितीमधून मार्ग काढण्याची हातोटी आहे !

सरतेशेवटी सर्वांच्या अथक परिश्रमानंतर १४ वर्षांनी, १८८३ मध्ये पूल बांधकाम पूर्ण झाले. पुलाच्या चाचणी (टेस्ट) साठी, त्यावेळच्या पद्धतीप्रमाणे, पुलावरून प्रथम घोडागाडी चालवण्यात येणार होती. त्यासाठी वॉशिंग्टनने एमिलीचे नाव सुचवले. तेव्हा एमिली एका बग्गीतून पुलावरून जाऊ लागली. त्यावेळी पिंजऱ्यामध्ये एक कोंबडा विजयाचे प्रतीक म्हणून तिच्या मांडीवर होता. त्यावेळी पुलावर उभ्या असलेल्या कामगारांनी एमिलीचा जयजयकार केला. पुलाचा अधिकृत उद्घाटन समारंभ झाला २४ मे, १८८३ रोजी. त्या दिवशी एमिली, आपला मुलगा जॉनसह ब्रूकलिनहून निघाली आणि मॅनहॅटन बाजूने येणाऱ्या त्याकाळचे अमेरिकेचे अध्यक्ष चेस्टर आर्थर ह्यांना पुलाच्या मध्यभागी भेटली. हा समारंभ वॉशिंग्टन ह्यांनी दुर्बिणीतून आपल्या खोलीतून बघितला.

आजही पुलावर, ब्रूकलिन बाजूच्या मनोऱ्यावर एमिलीच्या कामगिरीबद्दल एक अलंकृत फलक (प्लॅक) पाहायला मिळेल. त्या वरील मजकुराचे स्वैर भाषांतर- हा पूल एमिली वॉरेन रोबलिंग (१८४३-१९०३) ह्यांना समर्पित करत आहोत. त्यांनी विश्वास व धैर्य ह्यांच्या जोरावर अंथरुणावर खिळून असलेल्या आपल्या नवऱ्याला -कर्नल वॉशिंग्टन रोबलिंग (१८३७-१९२६) ह्यांना पूलबांधकाम पूर्ण करण्यास मदत केली.' शेवटी लिहिले आहे -'एखादे भव्य कार्य यशस्वी होण्यामागे एका स्त्रीचे भक्कम योगदान असते!'

खरोखर, हे विधान ब्रूकलिन ब्रिज आणि एमिली वॉरेन रोबलिंग ह्यांच्याबाबतील तंतोतंत लागू पडते !

***

# अशी ही अन्नपूर्णा (दुर्गाबाई भागवत)

- **वसुंधरा पर्वते** (फॉस्टर सिटी, कॅलिफोर्निया)



१११ वर्षांपूर्वी १० फेब्रुवारी १९१० रोजी ज्यांचा जन्म झाला त्या विदुषी दुर्गाबाई भागवत यांचं या लेखाद्वारे पुण्यस्मरण.

मानववंशशास्त्र, समाजशास्त्र, धर्मशास्त्र, आदिवासींचं जीवन, निसर्ग अशा प्रचंड आवाक्याच्या अनेक विषयांना सहजपणे पेलणाऱ्या दुर्गाबाई भागवत. आणिबाणीच्या राजकारणातही नवी दिशा देणाऱ्या तेजस्विनी म्हणजे दुर्गाबाई भागवत. अभ्यास आणि लिखाण हे ज्यांचे श्वास आणि उच्छ्वास होते त्या दुर्गाबाई भागवत. संशोधन आणि साहित्यक्षेत्रात आपल्या व्यक्तिमत्वाचा ठसा उमटविणाऱ्या दुर्गाबाई भागवत. या सगळ्याबरोबर पाककलेसारख्या प्रापंचिक विषयातही तेवढाच रस घेऊन तिथेही संशोधन करणाऱ्या दुर्गाबाई भागवत.

स्वयंपाक या विषयाची त्यांना किती आवड होती हे सांगताना त्या म्हणतात, "स्वयंपाकाची मला लहानपणापासून आवड! माझी आई, आजी, चुलती यांच्याकडून मी स्वयंपाक शिकले. इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा मला स्वयंपाक करायला आवडतो. खरं म्हणजे मी लेखिका चुकून झाले, खरं तर स्वयंपाकीणच व्हायची.

आपल्या 'दुपानी' या पुस्तकात त्या म्हणतात, "स्वयंपाक ही पोटपूजा तर आहेच पण ती अन्नपूर्णेची आदिकला आहे- मन, काळीज आणि पोट सुखावणारी, डोळ्यांना आनंद देणारी. रसांची ती धनी आहे, रंगांची ती उधळण करते म्हणूनच आपल्या संस्कृतीत तिला रसवंती म्हणतात. रसवंतीचं रसोई हे वेगळं रूप. जणू आपल्या आपणच निसर्गघटनेप्रमाणे शिजून तयार होणारा विधी म्हणूनच याला स्वयंपाक म्हणतात. हे अन्नपूर्णेचं शास्त्र आहे. तिची ही सहजसाध्य कला आहे, तिच्या कष्टांची सुंदर परिणती आहे. खाणा-यांची तुष्टी आणि पुष्टी हे पाककलेचं एकमेव ध्येय आहे.

मी देवदेव करणारी नसले तरी अन्नपूर्णेची भक्त आहे. रस्त्याच्या कडेला बसून फुटक्या शेगडीवर हातावरच्या सुंदर भाकऱ्या करीत असलेल्या गृहिणी, समारंभात मांडे करणाऱ्या, पाच पाच फूट शेवयांची सुतं वळणाऱ्या, तऱ्हेतऱ्हेची पक्वान्नं करणाऱ्या गृहिणी बघितल्या, की त्यांची तन्मयता, कार्यकुशलता मला मोहित करते. "

समाजाची, देशाची संस्कृती म्हणजे काय याचा उहापोह अनेकांनी आपापल्या परीने केलेला आहे. पण दुर्गाबाई म्हणतात, "पाली शब्दकोशात तसंच मनुस्मृतीमधे 'संस्कृ' या शब्दाचा अर्थ स्वयंपाक करणे हाच आहे. वेगवेगळी धान्ये, भाजीपाला, मांस, मासे यांच्यावर वेगवेगळ्या चवीच्या मसाल्यांचे संस्कार करून स्वयंपाक करणे ही संस्कृती. त्यावरूनच मग समाजमानसावर साहित्य, कला, ज्ञान, तत्त्वज्ञान, विज्ञान इत्यादिंचे संस्कार करून जे सिद्ध होतं ती समाजाची संस्कृती असं म्हणायला हरकत नाही." 'ऐसपैस गप्पा दुर्गाबाईंशी' या पुस्तकात लेखिका प्रतिभा रानडे यांनी दुर्गाबाईंशी केलेल्या गप्पांमधून त्यांच्या पाककलेच्या संशोधनाची बरीच माहिती मिळते.

स्वयंपाक ही सर्वसाधारणपणे स्त्रियांची मक्तेदारी समजली जात असली तरी स्वयंपाकाचा शोध पुरुषांनी लावला असावा असा दुर्गाबाईंचा अंदाज आहे. त्या म्हणतात, "प्राचीन भारताचं वैशिष्ट्य असं, की बाईला कोणी स्वयंपाकीण म्हणून वागवलेलं नाही. यज्ञाच्या वेळी नैवेद्य म्हणून वापरला जाणारा पुरोडाश हा पुरुषानीच तयार करायला हवा असा नियम होता." या संदर्भात त्या महाभारतातले अनेक मनोरंजक दाखले देतात. भीम आणि नलराज पाकशास्त्रात प्रवीण होते एवढंच नव्हे तर नलराजाने पाककलेवर संस्कृतमध्ये लिहिलेलं पुस्तक प्रसिद्ध होतं. या पुस्तकाचं भाषांतर करण्याची दुर्गाबाईंची इच्छा अखेरीस अपूर्णच राहिली. त्या म्हणतात, "भीमाला स्वयंपाकाची आवड होती म्हणूनच कदाचित अज्ञातवासात त्याला बल्लवाचार्याची भूमिका मिळाली असावी."

श्रीखंड कसं करायचं ते भीमानं शोधून काढलं. श्रीखंड आणि फ्रूटसॅलड-वेगवेगळी फळं दह्यासाखरेच्या मिश्रणात घातलेल्या या पदार्थाला शिखरिणी असं नाव होतं. तसंच श्रीकृष्णाने घीवर हे पक्वान्न शोधून काढलं. नलराजा तर विविध खाद्यपदार्थ करण्यात पारंगत होता. तो धर्मराजाला सांगतो "तू एकदा का माझ्या हातचं जेवलास तर दुसऱ्या कुणाच्या हातचं तू कधीच जेवणार नाहीस"

पाणी थंडगार कसं करायचं, त्याचा बर्फ कसा करायचा, ते सुवासिक कसं करायचं हे नलराजा सांगतो. हिमालयातून बर्फ आणून तो टिकवायचा कसा ते नलराजाला माहीत होतं. "तुला अग्नीशिवाय स्वयंपाक करता येईल" असा वर त्याला अग्नीनेच दिला होता. नलराजा राहणारा उत्तरेचा पण त्याच्या पाककृतींचं कौतुक दक्षिणेत अधिक झालं. नलराजाची आठवण म्हणून धुंधुर्मास करायचा, रानात जाऊन जेवायचं असं दक्षिणेत सांगतात.

पाककलेतील जनावरांचा सहभाग दुर्गाबाईंच्या नजरेतून सुटला नाही. अस्वलांचं करडी पंचामृत आणि माकडांचे डिंकाचे लाडू यांचं वर्णन करताना त्या म्हणतात, "अस्वलं पंचामृत आणि फणसपोळी करतात, त्यांचं नाक अतिशय तीक्ष्ण असतं, वेगवेगळी सुगंधी फळं फुलं आणून अस्वल ते पायांनी, काठ्यांनी कुटतो आणि ते मिश्रण खातो. या पदार्थाला करडी पंचामृत म्हणतात. शिकारी अस्वलांना हुसकून लावतात आणि हे पंचामृत मिळवतात."

माकडीण बाळंतीण होते तेव्हा नर माकड जंगलातून डिंक, मध गोळा करून त्याचे लाडू करून माकडीणीला खायला घालतो असं त्यु भागातल्या शिकाऱ्यांना आढळलं. पाककलेचा अभ्यास करण्यात जसा दुर्गाबाईंना रस होता त्यापेक्षा जास्त रस त्यांना प्रत्यक्ष स्वयंपाक करण्यात होता. आपला मराठमोळ्या जेवणाचा मेन्यू सर्व दृष्टीने आदर्श आहे असा त्यांचा विश्वास होता. त्यासाठी त्यांनी वर्तमानपत्रात 'खमंग' हे सदर सुरू केलं. साध्यासुध्या, स्वादिष्ट पण हल्लीच्या गृहिणींना माहिती नसलेल्या मराठमोळ्या पदार्थांच्या कृती द्यायला त्यांनी सुरुवात केली. या लेखांचं 'खमंग' नावाचं एक छोटेखानी पुस्तकही प्रकाशित झालं. या पुस्तकात हातावरच्या भाकऱ्या, ओतलेली भाकरी, उसाच्या रसातील दशमी, गाकर,

सांदणं, उकडीच्या पोळ्या अशा अस्सल मराठी पदार्थांच्या कृती आहेत. नैसर्गिक रंगाच्या पेरूच्या, रायआवळ्याच्या, कवठाच्या जेली आहेत. कुवळाचे पोहे, मोदक असे कोकणी पदार्थ तसंच बाजरीची उसळही आहे. आपल्या आजी-पणजीची आठवण यावी असे साधेसुधे पौष्टिक पदार्थ त्यांच्या इतिहासासकट दुर्गाबाईंनी या पुस्तकात दिले आहेत. ठिकरीची फोडणी, केवड्याच्या कणसाची भाजी, केवड्यात ठेवून सुगंधी केलेला कात अशा चमत्कृतीपूर्ण पदार्थांनी हे पुस्तक सजलं आहे.

धिरडी करायला घेतली पण ती मोडायला लागली मग उपाय काय? हा उपाय दुर्गाबाई जावयाच्या गोष्टीतून सांगतात. जावई म्हणतो, "माझी आई तव्यावर धिरडं टाकलं की झाकण ठेवते आणि तुळशीला पाणी घालून येते." मुद्दा तुळशीच्या फेरीचा नाही; धिरडं उलटण्याची घाई न करता योग्य वेळ मध्ये गेला, की धिरडं न मोडता उलटता येतं हे सांगण्यासाठी ही गोष्ट.

निवडुंगाच्या बोंडाचा रस, तुळशीचा रस हलव्याच्या पाकात घालून हलवा रंगवण्याची कल्पना दुर्गाबाईंचीच. मोदकाची तेल घातलेली उकड तुडतुडीत होते पण त्याचे कंगोरे चांगले येतात, तूप घातलेल्या उकडीचे मोदक बैठे, वाटोळ्या कंगोऱ्यांचे आणि गुबगुबीत दिसतात हाही शोध दुर्गाबाईंचाच.

'खमंग'पुस्तकात त्या लिहितात, पाककलेच्या बाबतीत मी जातीभेद अवश्य मानते व तो एक सुसंस्कृतपणाचा भाग आहे असंही मानते. प्रत्येक घरात स्वयंपाकाची वेगळी पद्धत असते. ही रूचिभिन्नताच या देशाचं वैभव आहे. या बाबतीत जातीयता मारक नसून सुगरणपणाला ती तारकच आहे.

हा चालताबोलता विश्वकोश ७ मे २००२ रोजी कायमचा विसावला. त्यांच्याच भाषेत सांगायचं झालं तर 'दळून झाल्यावर पीठ भरून ठेवावं, जातं उभं करावं आणि आपण भिंतीला टेकून बसावं तेव्हा काम पूर्ण केल्याचं समाधान मिळतं, थकवाही येतो आणि एक तऱ्हेचा शांत विसावाही मिळतो' हा विसावा घेऊन झाला, की कुणी सांगावं पुनर्जन्मावर विश्वास असलेल्या दुर्गाबाई पुन्हा एकदा जात्यावर दळायला जन्म घेतील सुध्दा!


***

## बर्फाचे वादळ

- **शुभदा गतारे-कोरे** (ऑस्टिन, टेक्सस)








थेंब थेंब थबकले, सारे गोठले हो जल
आले आले हो वादळ, आले बर्फाचे वादळ ।

बर्फाळल्या वृक्षवेली, पानं, फुलं आच्छादली
घराघरांनाही जणू किती झुंबरं टांगली ।

जखडली फांदीन् फांदी, आता सोसवेना भार
बिलगली धरणीला, माय देईल आधार ।

पिकं झाली निष्प्राण, प्राणिमात्र हो हैराण,
उन्मळली झाडे झाडे, सुने झाले हो अंगण ।

पाणी नाही, नाही वीज, अहो गोठली की घरं
सारे झाले हतबल, किती झाले निराधार ।

जग नाही पाण्याविना, पाणी म्हणजे जीवन
पूर असो वा वादळ, प्रकोपाने मुकतील प्राणं ।

जागा हो रे मानवा, तू नको करूस प्रहार
निसर्ग समद्यांचा वाली, त्याचा करा रे आदर ॥

***

# उत्तररंग

**एकमेकांचे धरुनी हात | सुखशान्तीची शोधू वाट ||**
**चला राहू आनंदात | आयुष्याच्या उत्तररंगात ||**

बृ . म. मंडळाच्या "उत्तररंग" प्रकल्पांच्या माहितीसाठी संपर्क:
**संदीप दीक्षित** बृ. म. मंडळ कार्यकारिणी सदस्य, उत्तररंग नेतृत्व
फोन क्र. 1-216-926-6696, ईमेल sandeep.dixit@bmmonline.org
**विद्या जोशी-** अध्यक्षा, बृ. म. मंडळ फोन क्र. 1-224-321-2948
ईमेल Vidya.Joshi@bmmonline.org

**उत्तररंग सत्र : जानेवारी १, २०२१ नाट्यसंगीत आणि "एका पात्राची ऑनलाईन गोष्ट"**

- **स्मिता कंटक** (विल्मिंग्टन, डेलावेअर)



सत्राच्या पहिल्या भागात नाट्यसंगीताचा कार्यक्रम सादर झाला. नेहा कुलकर्णी (ईस्ट बे एरिया, कॅलिफोर्निया) यांनी या कार्यक्रमाचे अभ्यासपूर्ण निवेदन केले. त्यांनी या नाट्यपदांची आणि नाटकांची पार्श्वभूमी, इतिहास आणि सामाजिक महत्त्व सांगितले. गीतकार, गायक, संगीतकार यांची वैशिष्ट्येही त्यांनी उलगडून सांगितली. १८८० मध्ये प्रथम प्रयोग झालेल्या "संगीत शाकुंतल" नाटकापासून ते अगदी अलिकडच्या "एका लग्नाची गोष्ट" पर्यंतच्या काळातील विविध नाट्यसंगीताची झलक दाखवणाऱ्या या कार्यक्रमाने प्रेक्षकांना संगीताबरोबरच स्मरणरंजनाचा आनंद दिला. या कार्यक्रमातील कलाकार: रिया नाईक (कनेक्टिकट)- नांदी: "पंचतुंड नररुंडमालधर"(संगीत शाकुंतल); स्वरा कायंडे (वय वर्षे ८, कनेक्टिकट)- "या नव नवल नयनोत्सवा"(संगीत मानापमान); योगिनी जोशी (ओरलँडो, फ्लोरिडा) - "हे सुरांनो चंद्र व्हा"(संगीत नाटक- ययाति आणि देवयानी), तबला - वैभव जोशी; नम्रता महाबळ वर्तक (बे एरिया, कॅलिफोर्निया) - "गुंतता हृदय हे"(संगीत मत्स्यगंधा) तबला- श्रेयस वर्तक; गौतम नाईक (कनेक्टिकट) - "मला सांगा सुख म्हणजे नक्की काय असतं?"(एका लग्नाची गोष्ट).

सत्राच्या दुसऱ्या भागात कनेक्टिकटच्या कलाकारांनी गाजलेल्या विनोदी नाटकांमधल्या पात्रांची आणि संवादांची मनोरंजक, संस्मरणीय गुंफण सादर केली. या **कार्यक्रमातील कलाकार:** सचिन कुलकर्णी (वस्त्रहरण), गौतम नाईक (वऱ्हाड निघालं अमेरिकेला), ज्योत्स्ना कुरकुटे (ती फुलराणी), स्मिता आणि महेंद्र जोग (हसवाफसवी), वैदेही आणि किरण परांजपे (शांतेचं कार्टं), केदार दफ्तरदार (करोनावरची वरात) , लेखन - बंडा जोशी , संकल्पना, लेखन, दिग्दर्शन, संयोजन - गौतम नाईक, निवेदन - प्राजक्ता दीक्षित. तंत्र सहाय्य - राधिका परमानंद.

**जाने. २३, २०२१-** विषय: "शिवाजी महाराज"
वक्ते: श्री विजय पाटील

- **अजित नातू** (फोल्सम, कॅलिफोर्निया)



मराठी माणूस आजही "शिवाजी महाराज" हे नुसते शब्द ऐकले, की अभिमानाने फुलून येतो! हे सुंदर वाक्य, "शिवाजी महाराज अमेरिका परिवार" या संस्थेचे संस्थापक, श्री विजय पाटील यांनी, २३ जानेवारी २०२१ रोजी, बृ. म. मंडळ उत्तररंगने आयोजित ३४ व्या कार्यक्रमात महाराजांबद्दलच्या त्यांच्या भाषणात बोलताना सांगितले!

"धर्मो रक्षति रक्षित:" हे श्री. पाटील यांच्या संस्थेचे ब्रीदवाक्य. त्यात जणू महाराजांनीच दिलेली शिकवण दिसते. श्री पाटील म्हणाले, की धर्मरक्षण हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे, सरकार, नेते यावर अवलंबून न रहाता आपणच, महाराजांचे एक मावळे बनून केलेले, ते आवश्यक काम आहे. स्वराज्य व स्वातंत्र्य यात फरक आहे. स्वराज्य या शब्दातच, आपले राज्य, सत्ता आली, तरी त्यात जबाबदारी अपेक्षित आहे. स्वातंत्र्य म्हणजे आपल्यावर कोणाची सत्ता नाही, मालकी नाही एव्हढेच. स्वराज्याची सुरुवात, ४०० वर्षांपूर्वी महाराजांनी, १६४५ साली रोहिडेश्वरावर वयाच्या अवघ्या १५-१६व्या वर्षी मूठभर मावळ्यांनासह स्वराज्यस्थापनेची शपथ घेऊन केली! १६७४ मध्ये शिवराज्याभिषेक हे स्वप्न साकार केले! स्वराज्य मिळवावे लागते, तसेच रक्षण करायला लागते, तो अभिमान पुढील पिढीला द्यायचे काम करायला लागते. श्री पाटील पुढे सांगतात, राजांनी. स्वातंत्र्य, समानता, व न्याय या तीन तत्त्वांवर स्वराज्य स्थापन केले तसेच गुणवत्ता आधारित पदाधिकारी नेमले, जातपात यावर नाही! फक्त महाराष्ट्राचा नव्हे, अखंड भारताचा विचार केला. म्हणूनच हिंदवी राज्य संबोधले, मराठा नाही. रयतेचे राज्य निर्माण केले. महाराजांच्या राज्यात महिलांना नुसता मान नव्हता तर सुरक्षितता होती, न्याय होता.

शिवजयंतीला राजांच्या वरील मूल्यांचे मनन करायला हवे, नुसते ढोलताशा नको. शिवाजी एक अष्टपैलू व्यक्तिमत्व होते. व्यवस्थापन गुणवत्ता, जे आज परकीयांकडे शिकतो, ते राजांचा नुसता अभ्यास केला तरी शिकायला मिळेल. भाषणाच्या शेवटी, श्री पाटील म्हणतात, की, मुलांना आपण अकबर-बिरबल कथा सांगतो, पण शिवाजीच्या गोष्टी का सांगत नाही? विचार करावा! श्री पाटील यांना उत्तररंगतर्फे मन:पूर्वक धन्यवाद!



## “कर विहार सामर्थ्याने...”

- **विनता कुलकर्णी** (शिकागो)

मार्च महिना आला, आणि जागतिक महिलादिनाच्या आधीच 'हॅप्पी वूमेन्स डे' शुभेच्छांचा पाऊस पडू लागला आहे. माझ्याही सेलफोनवर व्हॉट्स् अॅप मेसेजेसची टिंगटिंग वाढली आहे. तशी ती कुठल्याही दिवशी चालू असतेच. हॅप्पी गणेशचतुर्थी, हॅप्पी एकादशी... (मी उपास करून दुप्पट खात नसले तरी), हॅप्पी हॅलोविन डे...इत्यादी. आता हॅप्पी सर्वपित्री अमावस्या डे, हॅप्पी गटारी अमावस्या डे म्हणायचे बाकी आहे. अशा डिजिटल स्वरूपातील कृतींनी हॅपिनेसच्या प्रगतीपुस्तकात '-ई-भर' पडते आहे. काहीका असेना, निदान या निमित्ताने जगात हॅपिनेस वाढत असला तर, हेही नसे थोडके!

महिला पोलिस, महिला अंतराळ-वीरांगना, महिला वैमानिक, वकील डॉक्टर, शास्त्रज्ञ, राजकीय, सामाजिक सांस्कृतिक, साहित्यिक... अशा अनेक क्षेत्रात धडाडीने कामगिरी करणाऱ्या महिलांच्या यशोगाथा वाचल्या, ऐकल्या की त्यांच्या कामगिरीचा अभिमान वाटतो, प्रेरणा मिळते. पण आनंदाचा पेला काठोकाठ नाही भरत! म्हणून मग, काय ठिबकतंय, त्यातून, हे मी पाहू लागले. जनसामान्यांच्या मनातील वरवरचे पापुद्रे खरवडून पाहिले, आणि लक्षात आले, काही तळागाळाशी, काही तरी सलतंय, युगानुयुगे! अतिपरिचयाने, काहींना तो सलदेखील अंगवळणी पडला आहे. सप्टेंबर २०२० मध्ये प्रकाशित शोधनिबंधानुसार (National Partnership for Women & Familites Factsheet) समान कामासाठी, अमेरिकेत काही क्षेत्रात महिलांना पुरुषांपेक्षा कमी वेतन दिले जाते. https://www.nationalpartnership.org/our-work/resources/economic-justice/fair-pay/americas-women-and-the-wage-gap.pdf) रोजच्या साध्या जगण्यातही सक्षम महिलांना सामाजिक औद्योगिक क्षेत्रात समान कामासाठी पुरुषांसमान दर्जा नाकारल्याची उदाहरणे आजही आहेत. त्याबद्दल सविस्तर नंतर कधीतरी लिहीन. लहानपणापासून टाळ्या पिटत “वामांगी रखुमाई...” म्हणणारे लोक पाहत आल्याने, तेव्हा त्याचा अर्थ, मी एकदा माझ्या आजीला विचारला होता. आजी मला जवळ घेऊन म्हणाली होती, 'माझ्या मनातलं बोललीस गं तू ! पण असतात असे काही डावे नियम बाईच्या वाट्याला या जगात'... आणि गप्प झाली. तेव्हा याचा अर्थ कळण्याइतपत मला समज नव्हती.

माझी आजी- रमा पुरुषोत्तम हिर्लेकर/पूर्वाश्रमीची नाफडे. तिचे लग्न त्या काळात १८ वर्षे वयाच्या आतच झाले. तिच्या मताचा प्रश्नच नसावा तेव्हा. शिक्षण इयत्ता सातवी, परंतु तिला मराठी, संस्कृत गणित यात उत्तम गती आणि इंग्रजीचे जुजबी ज्ञान होते. लग्नानंतर पुढे ती केवळ कानी जे पडेल ते ऐकत शिकत राहिली. मराठी, संस्कृत श्लोक, सुभाषिते, स्तोत्रे, असंख्य म्हणी, गाणी, सुगम संगीत, संगीत नाटकातील प्रवेश, नाट्यगीते यांचे तिचे पाठांतर भरपूर. नवीन गोष्टी समजून घेण्याची जिज्ञासा. आजी सुबक ठेंगणी, लख्ख देखणी होती. आजी सासरी आली आणि मग आजोबांच्या डॉक्टरकीच्या पेशानिमित्त कोकणातून थेट विदर्भातच स्थलांतरित झाली. मनात आले की गेली माहेरी, असे त्याकाळी शक्यच नव्हते. कोकणात तिच्या माहेरगावी जाण्यासाठी काही अंतर बसने (एसटी) मग बोटीने, मग पुढे घरापर्यंत काही मैल चालत जावे लागे. दूर सासरी पूर्ण अपरिचित वातावरणात रुळताना, त्या 'टीन-एज' वयात माहेरच्या आठवणीने काय वाटले असेल तिला, हे तिच्या मनासच ठाऊक!

मात्र माझ्या आठवणीतले आजीचे रूप म्हणजे कपाळी कुंकू नाही, पांढरी साडी, वयाची सत्तरी उलटल्यावरही डोक्यावरच्या मुलायम केसांपैकी किमान ४० टक्के काळे केस, सुरकुत्या नसलेला तुकतुकीत चेहरा ! घरातील स्वच्छतेबद्दल ती फारच जागरूक असे. इस्त्रीलाही लाजवेल, अशाप्रकारे कपड्यांच्या नेटक्या घड्या घालायची. घरातील भांडी लखलखीत ठेवत असे. मनाने ती आधुनिक विचारांची, पण वैचारिक स्वातंत्र्य बहुधा कमीच मिळाले असावे तिला तिच्या आयुष्यात. घरात आर्थिक सुबत्ता मिळाली, कुणाचा तिला त्रास नव्हता, पण स्वतःच्या आयुष्याविषयी, बहुतेकवेळा पुरुषांनी घेतलेल्या निर्णयांवर आणि समाजाने दिलेल्या चौकटीत आपण आयुष्य काढतो आहे या जाणीवेची खंत असावी माझ्या आजीच्या मनांत, असं मला पुढे अनेक वर्षांनी तिच्या स्वभावाचा विचार केल्यावर जाणवते. मात्र माझ्या बालपणीच्या आठवणीत नातवंडांना जवळ घेणारी, त्यांच्या आनंदात स्वतःचा आनंद शोधणारी, स्वतः रचून गोष्टी सांगणारी प्रेमळ व्यक्ती हीच आजीची प्रतिमा आहे. तिची अजून एक आठवण:-

परकर-पोलक्यातली नात पाहून, आजी खूप आनंदली  
तिच्या कपाळी लाव तीट, सुनेला ती म्हणाली ।  
'तू स्वतःही लाव ना', केला हट्ट नातीने  
कुंकवाने येतो मला ताप, शोधली सबब आजीने ।  
असंच एकदा छोटीला, आईने साडी नेसवली  
खुलून दिसतोय हा रंग, आजी कौतुकाने उद्गारली ।  
'तूपण नेस की रंगीत साडी', नात म्हणाली आजीला  
क्षणभर वेगळाच रंग, आजीच्या डोळ्यात तरळला ।  
सावरून हलकेच म्हणाली, पांढऱ्यात असतात रंग सात  
अन् त्याचेच इंद्रधनुष्य, बघतेय मी तुझ्या रूपात ॥

या सर्वाचा अर्थ बालवयात कळत नव्हता, आणि आता कळूनही आजीशी थेट संवाद शक्य नाही. स्वतःच्या इच्छा, आकांक्षांना मुरड घालून, इतरांच्या आनंदात सामील होत वयाच्या ७८व्या वर्षी माझी आजी अनंतात विलीन झाली.

माझी आजी ही केवळ त्या काळातील काही सामाजिक रीतींमध्ये अडकलेली प्रातिनिधिक व्यक्ती. पिढ्यान्पिढ्या काही प्रथा, परंपरांच्या ओझ्याखाली अनेक मुली, आज्या, पणज्या यांच्या आकांक्षा विरून गेल्या. अजूनही जगात कुठेन् कुठे काहीजणी लादलेल्या कुंपणापलीकडचं विश्व शोधण्यासाठी आसुसलेल्या आहेत. त्यातली एकादी असामान्य मलाला यूसुफजई (https://malala.org/) तावून सुलाखून अधिकच तेजस्वी, खंबीर बनते. आणि इतरांनाही मदतीसाठी हात पुढे करते. आजवरच्या नोबेल पुरस्काराने सन्मानितांपैकी वयाने सर्वात लहान अशा मलालाने स्थापन केलेल्या “मलाला फंड”चे घोषवाक्य देखील “जगभरातील प्रत्येक मुलीला तिच्या आवडी-निवडीचे भविष्य साधण्याची संधी मिळावी”, हे आहे ! गरज आहे समाजातील विविधस्तराने, 'स्त्री' क्षमता मान्य करण्याची, आकाश मोकळं आहे, हे 'ती'ला सांगण्याची!

**जागतिक महिलादिन ८ मार्च निमित्त समस्त महिलांना शुभेच्छा!**

बृहन्महाराष्ट्र वृत्त

॥ मराठी तितुका मेळवावा ॥

Subscription Remittance Address
BMM Newsletter
144 Hope Road,
Holland, PA 18966-5408

BMM बृहन्महाराष्ट्र मंडळ



नाते जुळते मनाशी मनाचे




Reshimgathee

A BMM Matrimonial Initiative for
Maharashtrians in North America

https://reshimgathee.bmmonline.org/

**HEALTH INSURANCE**

**INDIVIDUAL & GROUP HEALTH INSURANCE FOR**

*** VISITORS**
*** H-1 B VISA HOLDERS**
*** PERMANENT RESIDENTS**
**( Some restrictions apply)**

**For more information:**

**Contact: Padmaja Bapat**
**Independent Insurance Agent**

**616 Rhodes Hill Court**
**Martinez, GA 30907**

Tel: **888 705 8271**

E-mail: padmaja.p.bapat@gmail.com

Website: **visitors-insurance.com**